प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन, अपिलार्थी यांनी वरील सातही प्रकरणात सारखीच माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या लेखी व तोंडी युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद कार्यालय, पैठण, खुलताबाद, गंगापूर, फुलंब्री, सोयगांव, कन्नड व सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या सातही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे

अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद कार्यालय, पैठण, खुलताबाद, गंगापूर, फुलंब्री, सोयगांव, कन्नड व सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१३.१०.२०२५** रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, पैठण, खुलताबाद, गंगापूर, फुलंब्री, सोयगांव, कन्नड व सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे सात द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.:- 1627 दिनांक :- 16/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४३८६/२०२४**
**बोर्ड क्र.०९**

श्री. शामराव तानाजी डोईफोडे, — अपिलार्थी
रा. छायानगर, हौसिंग सोसायटी एन-९, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०१.२०२४ | पैठण येथील घर नंबर ४६९/२ आमळनेरकर महाराष्ट्राच्या मठासाठी बांधकाम परवानगी सन २०१७ सालची परवान्याची नक्कल मिळणेबाबात. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०९.०१.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्याबाबत कोणतीही दखल घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. उपलब्ध अभिलेखावरुन

अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच दि.१३.१०.२०२५ रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 11628 दिनांक : 16|9|2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५५१२/२०२४**
**बोर्ड क्र.१०**

श्री. प्रशांत सुभाष चव्हाण, — अपिलार्थी
रा. साळीवाडा, पैठण,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीन

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. विलास गावडे, स्वच्छता निरिक्षक, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०३.२०२४ | सन २०१८ ते २०२२ य कालावधीतील ओंकारेश्वर सुशिक्षीत बेरोजगार सहकारी संस्था, मर्या छत्रपती संभाजीनगर यांनी नगर परिषद कार्यालय, पैठण यांच्याशी सन २०१८ रोजी साफसफाई व घंटा गाडी या संदर्भात करार केलेला होता. त्या संबंधीत सदरील कपंनीच्या टेंडरची प्रत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१३.१०.२०२५** रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

५/२/१६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ११६२९ दिनांक :- 16/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७२५५/२०२४,८४२२/२०२४,**
**व ८४२३/२०२४**

**बोर्ड क्र.११ ते १३**

श्री. राहुल कुंडलिक पगारे, : अपिलार्थी
ह.मु.पो. जायकवाडी उत्तर,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, मो. नं.९८५००९९७९८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, पैठण,
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा भरुन दिलेला नाही )

अपिलार्थी यांनी तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०४.२०२४ | पैठण नगर परिषद हद्दीतील शहरातील संतनगर यात्रा मैदानातील महाराष्ट्र शासनाने टाकलेले राखीव क्षेत्र वगळण्यात आले आहे व त्या ठिकाणी ज्या बाबीसाठी नियोजन करण्यात येत आहे. त्या संदर्भातील सद्यस्थितीत चालू असलेल्या सन २०२२-२०२३,२०२४ या कालावधीतील संचिकेतील संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत करुन देण्यात याव्यात. |
| २०.०५.२०२४ | सन २०२४ या कालावधीतील पैठण नगर परिषद हद्दीतील पैठण पोलीस स्टेशन समोर असलेल्या पाडण्यात आलेल्या समाज मंदिराच्या स्क्रॉप मटेरियलची माहिती मिळणेबाबत. |
| २०.०५.२०२४० | सन २०२४ या कालावधीतील आपल्या पैठण नगर परिषद हद्दीतील पैठण पोलीस स्टेशन शेजारी जुने समाज मंदिर येथे सुरु असलेल्या नाटयगृह बांधकामाचे अंदाजपत्रक, लेआऊट नकाशा, बांधकाम नकाशा, नाटयगृह बांधकामाची संपूर्ण संचिका इत्यादींची मागणी केल्याप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत करुन देण्यात याव्यात. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तिन्ही प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत अद्याप माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास जाणीव पुर्वक टाळाटाळ करीत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या तीन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील

तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच दि.१३.१०.२०२५ रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11630 दिनांक : 16/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ८०९८/२०२४**
**बोर्ड क्र.१४**

श्री. लक्ष्मण यमराव यादव, — अपिलार्थी
रा. नवीन नारळा, पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नं.९७६७३२५१६१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही )

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०५.२०२४ | दि.०१.०३.२०२४ ते दि.३०.०४.२०२४ या कालावधीतील घर बांधकाम परवानगी क्र.(पी.आर कार्ड क्र.१३३१) दि.०३.०४.२०२४ या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयीन अभिलेखात आढळून आल्याचे दिसून येत नाही असे दि.०७.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट माहिती दिली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी

माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी आज रोजी सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. याप्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. अशी माहिती अपिलार्थीस सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून माहिती अधिकार अधिनियम कलम १९(८)(क)(दोन) नुसार अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने **मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना याप्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.**

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. मात्र माहिती उपलब्ध नसल्याच्या काही शक्यता असू शकतात. जसे माहितीची निर्मितीच झाली नाही किंवा माहिती संदर्भातील अभिलेखे आवश्यक कार्यवाही करिता वरिष्ठ कार्यालयात सादर केले असल्यामुळे किंवा माहिती संदर्भातील अभिलेख गहाळ झाले असल्यामुळे इ. सबब विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयात पुनश्च शोध घेण्यात यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयात पुनश्च शोध घ्यावा याकामी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करावा व या कार्यवाही दरम्यान उपलब्ध झालेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द, अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार संबंधित पोलीस स्टेशन मध्ये F.I.R. दाखल करण्याची कारवाई करावी, अशी कार्यवाही करताना सर्व वस्तुनिष्ठ बाबीची शहानिशा करण्यात यावी.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12148 दिनांक : 23/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
२. निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८५५९ ते ८५६१/२०२४,**
**१०८०२ ते १०८०५/२०२४ एकूण नस्ती ०७**
**बोर्ड क्र.१५ ते २१**

श्री. अंतोन शामसुंदर गायकवाड, — अपिलार्थी
रा. नाथमंदिराच्या मागे, नाथकृपा हॉटेल,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर
मो. नं.९८५०२९१६७२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
स्वच्छता निरिक्षक,
नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०८.२०२४व १६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये सात द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. व्हि. यु. गावंडे, उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सात जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०३.२०२४ | १. पैठण येथील गंगा गोदावरी नदीपात्रातील नाथ मोक्ष ध्ाटावरील हदगाडया व दशक्रिया हॉलमधील महिला व पुरष यांनी केलेल्या अतिक्रमण त्वरीत काढण्याबाबत २. तीर्थ क्षेत्र पैठण येथील गंगा गोदावरी नदीपात्रामधील नाथ मोक्ष घाट येथे संत महात्मे महाराज, ब्राम्हण, दशक्रिया लुट थांबविण्याबाबत, तरी आपण केलेल्या कारवाहीची माहिती दयावी. |

| | |
|---|---|
| १५.०३.२०२४ | १. सन २०२३ ते २०२४ परंतु गोदावरी नदी स्वच्छताचे टेंडर आपल्या कार्यालयाने दिल्याबाबतची माहिती दयावी २. दि.१२.०३.२०२४ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाबाबत माहिती दयावी, विषयांकित तक्रार अर्ज की तीर्थ क्षेत्र पैठण येथे गोदावरी नदीमध्ये स्वच्छतेसाठी टेंडर देऊन सुध्दा काम केलेले नसल्यामुळे सदरील टेंडर देऊन सुध्दा काम केले नसलयामुळे सदरील टेंडर रद्द करावे कारण की संचलित गंगा गोदावरी स्वच्छता विकास फौऊंडेशन पैठण हे गोदावरी नदी स्वच्छ करणाऱ्या मजूरांचा पगार हा लोकस्वच्छ वर्गणी देणगी पेटी मधून करीत असल्याबाबत तरी आपण केलेली कारवाईची माहिती दयावी. |
| ०४.०३.२०२४ | मा. नायब तहसिलदार (गृह) जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी दि.३०.०६.२०२३ रोजी जा.क्र.२०२३/गृहशाखा दंड विभाग/संकलन-५/कावि१२०९ शासन गृह विभागाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण०७२१/प्र.क्र.१४४/विशा-१३४ दि१० ऑगस्ट २०२१ नियमानुसार तात्काळ आवश्यक ती कारवाई करुन उपोषण कर्त्यास आपल्या स्तरावर समर्पक उत्तर देण्यात यावे, विनंती असा आदेश दिला होता तरी आपण केलेल्या कारवाईची माहिती दयावी. |
| ०४.०३.२०२४ | वरील साहेबांनी दि.०६.०९.२०२३ रोजी पैठण येथी गंगा गोदावरी नदीपात्रातील नाथ मोक्ष घाट याची स्वच्छता, साफसफाई विकास करण्याची ना हरकत मिळण्याबाबत आदेश दिला होता की उपरोक्त विषयांकित केल्याप्रमाणे तक्रारी निवेदने प्राप्त झाले असून हे पैठण नगर परिषदेच्या अखत्यारीत असल्यामुळे या विषयी आपले स्तरावरुन नियमोचीत कार्यवाही करावी तरी आपण केलेल्य कारवाईची माहिती दयावी. |
| २३.०४.२०२४ | १.सन २०२३ ते २०२४ परंतु गोदावरी नदी स्वच्छताचे टेंडर आपल्या कार्यालयाने दिल्याबाबतची माहिती दयावी, २. दि.१२.०३.२०२४ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाबाबत माहिती दयावी, विषयांकी तक्रार अर्ज की तीर्थक्षेत्र पैठा येथे गोदावरी नदी मध्ये स्वच्छता विकास फौऊंडेशन पैठण हे गोदावरी नदी स्वच्छ करणाऱ्या मजूरांचा पगार हा लोक स्वच्छा वर्गणी देणगी पेटी मधून करीत असल्याबाबत तरी आपण केलेल्या कारवाईची माहिती दयावी. |
| ०४.०३.२०२४ | मा. नायब तहसिलदार (गृह) जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी दि.३०.०६.२०२३ रे जी जा.क्र.२०२३/गृहशाखा दंड विभाग/संकलन-५/कावि१२०९ शासन गृह विभागाचे परिपत्रक नियमानुसार तात्काळ आवश्यक ती कारवाई करुन उपोषण कर्त्यास आपल्या स्तरावर समर्पक उत्तर देण्यात यावे ही विनंती असा आदेश दिला होता तरी आपण केलेल्या कारवाईची माहिती दयावी. |
| ०४.०३.२०२४ | १ पैठण येथील गंगा गोदावरी नदीपात्रातील नाथ मोक्ष घाटावरील हदगाडया व दशक्रिया हॉलमधील महिला व पुरुष यांनी केलेले अतिक्रमण त्वरीत काढण्याबाबत २. तीर्थक्षेत्र पैठण येथील गंगा गोदावरी नदीपात्रामधील नाथ मोक्ष घाट येथे संत महोत्सव महाराज, ब्राम्हण, दशक्रिया लुट थान विषयाबाबत, तरी आपण केलेल्या कारवाईची माहिती दयावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे कार्यालयात उपस्थित राहून अवलोकन करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. एक सारखची सेम माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरिक्षक, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या सातही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे सातही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 11631 दिनांक :- 16/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८८२१/२०२४**
**बोर्ड क्र.२२**

श्री. निमेश अनिल पटेल, — अपिलार्थी
मु. पो. ताराकुंज निवास पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय,
पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. विलास गावंडे, स्वच्छता निरिक्षक, नगर पालिका, पैठण उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०७.२०२४ | पैठण येथील यात्रा मैदानची सविस्तर माहिती मिळणेबाबत, १. सध्या यात्रा मैदान येथे व्यापारी संकुलाचे काम सुरु आहे का, असल्यास याबाबत नगर रचना विभागाचे ना-हारकत प्रमाणपत्र व परवानगी घेण्यात आली आहे का, असल्यास त्याची प्रत देण्यात यावी २. व्यापारी संकुलाचे बांधकाम सुरु करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी मिळाली आहे का, असल्यास त्याची प्रत देण्यात यावी. ३. यात्रा मैदानाची जागा ही फ्लॅट झोन मध्ये येत आहे का, असल्या या ठिकाणावर पक्के बांधकाम करता येते का, ४. तत्कालीन जिल्हाधिकारी व्ही. राधा यांनी यात्रा मैदात ही जागा राखवी ठेवणेबाबत निर्णय घेतला आहे का, नगर परिषद कार्यालयास पत्रव्यवहार |

| | |
|---|---|
| | केला असल्यास संपूर्ण कागदपत्रासह लेखी स्वरुपात देण्यात यावी. ५. तत्कालीन नगराध्यक्ष दता गोर्डे यांच्या कार्यकाळात २०१५-१६ मध्ये यात्रा मैदानात व्यापारी गाळे बांधण्यात आले व नंतर पाडण्यात आले याबाबत झालेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती संपूर्ण कागदपत्रासह लेखी स्वरुपात देण्यात यावी ६. यात्रा मैदान येथील व्यापारी गाळे पाडण्यात यावे व नगराध्यक्ष आणि नगरसेवक यांना निलंबित करण्यात यावे म्हणून जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची व जिल्हाधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती सर्व कागदपत्रासह लेखी स्वरुपात देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०८.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, संपुर्ण माहिती जाणून बुजून दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१३.१०.२०२५** रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय

पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 11632 दिनांक:- 1/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४४७/२०२४**
**बोर्ड क्र.२३**

श्री. निजाम इस्माईल खान, — अपिलार्थी
रा. प्लॉट क्र.२०७ सिध्दार्थनगर, हडको एन.१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
लिपीक, आस्थापना विभाग,
नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. प्रशांत प्रकाशराव देशपांडे, लिपीक, आस्थापना विभाग, उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.१०.२०२३ | इ.स.१९७६ ते इ.स.१९८५ या कालावधीतील, माझा भाऊ स्वर्गीय वाहेदखॉ इस्माईलखॉ आपल्या कार्यालयात जकात विभागामध्ये नाका शिपाई म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती त्याची आदेशाची संबंधीत संचिका मिळणेबाबत, सेवेत असतांना त्यांचे दि.२४.०६.१९८५ ला निधन झाले असून त्यांची दुय्यम प्रत सर्व्हिस बुकची साक्षांकित प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती शोध घेतला असता आढळून आलेली नाही असे दि.१३.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी आज रोजी सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. याप्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. अशी माहिती अपिलार्थीस सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून माहिती अधिकार अधिनियम कलम १९(८)(क)(दोन) नुसार अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने **मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांना याप्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.**

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. मात्र माहिती उपलब्ध नसल्याच्या काही शक्यता असू शकतात. जसे माहितीची निर्मितीच झाली नाही किंवा माहिती संदर्भातील अभिलेखे आवश्यक कार्यवाही करिता वरिष्ठ कार्यालयात सादर केले असल्यामुळे किंवा माहिती संदर्भातील अभिलेख गहाळ झाले असल्यामुळे इ. सबब विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयात पुनश्च: शोध घेण्यात यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयात पुनश्च शोध घ्यावा याकामी कार्यालयातील कर्मचारी यांचा एक गट तयार करावा व या कार्यवाही दरम्यान उपलब्ध झालेली व अधिनियमातील तरतुदींनुसार देय होणारी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार संबंधित पोलीस स्टेशन मध्ये F.I.R. दाखल करण्याची कारवाई करावी, अशी कार्यवाही करताना सर्व वस्तुनिष्ठ बाबींची शहानिशा करण्यात यावी.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12149 दिनांक : 23/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५०२,४५०३ व ८८१६/२०२४**
**बोर्ड क्र.२४ ते २६**

श्री. मुकीदखॉन महेमदखॉन पठाण, — अपिलार्थी
रा. समर्थ नगर, कन्नड,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर-४३१००३,
मो. नंबर ९८९०२२०५२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा (द्वितीय अ.क्र.४५०२/२०२४) : उत्तरवादी क्र.१
अतिक्रमण विभाग, नगर परिषद, कन्नड,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद,कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

१ जन माहिती अधिकारी, (द्वितीय अ.क्र.४५०३/२०२४) : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकार, नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

१ जन माहिती अधिकारी तथा (द्वितीय अ.क्र/८८१६/२०२४) : उत्तरवादी क्र.१
आस्थापना विभाग,
नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०४.२०२४ व दि.०३.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी, श्री. पवन आसाराम परदेशी व श्री. प्रशांत प्र. देशपांडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२४ | सदरील अतिक्रमण उठवण्यासंबंधी मा. उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांना आपल्या कार्यालयामार्फत दिलेल्या ठरावाची प्रत देणे २. अतिक्रमण निष्कासित |

| | |
|---|---|
| | केल्यानंतर जागांवर पुन्हा अतिक्रमण झाले याची सद्यस्थितीची माहिती देणे ३. आपल्या कार्यालयामार्फत अतिक्रमणे निष्कामित केल्याचे मा. उच्च न्यायलय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांना दिलेल्या अहवालाची प्रत देणे. |
| १५.०१.२०२४ | १. सर्वे नं.४८ मधील शालीमार पान शॉप ते लेंडी नाल्यापर्यंतची संपूर्ण जागा वक्फ बोर्डाची मालमत्ता आहे. याची माहिती देणे २. सदरील जागा ही शासकीय मालमत्ता आहे याची माहिती देणे ३. सदरील जागेचा ७/१२ उताराची छायांकित प्रत देणे. |
| १०.०४.२०२४ | फलक लावण्याचा दिनांकापासून ते आजतागायत या कालावधीतील, आपल्या कार्यालयात नोटिस बोर्डावर लावलेला दंड संहितेचा फलक वस्तुस्थितीबाबत, नगर परिषद कन्नड कार्यालयात दर्शनी भागात सरकारी कर्मचारी व लोकसेवक विरुध्द केले जाणारे अपराध व त्याबाबत भारतीय दंड संहितेतील दंडणीय तरतुदी दर्शविणारे फलक लावलेले आहे. त्या संदर्भात व इतर. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा बोध होत नाही, असे कळविले होते. अपिलार्थी यांनी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणारी माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या युक्तिवाद, लेखी युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, (आस्थापना व अतिक्रमण) नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या तीन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11633 दिनांक : 16/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८९५५/२०२४**
**बोर्ड क्र.२७**

श्री. खरे समाज सेवक कार्यकर्ते, — अपिलार्थी
रा. फलॉट नंबर०२, मनाली अपार्टमेंट, इंदिरानगर, ता.जि. नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
नगर परिषद गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०५.२०२४ | दि.०१.०१.२०१२ ते ३०.०४.२०२४ या कालावधीतील सुखदेव व नामदेव मिरी सुखदेव, प्रवीण व अमोल सु. लगउ असे ४ जण गंगापूर नेऊरगाव रस्त्यालगत दक्षिणेस सन २०१२ पासून लगड वस्ती येथे १ अवैध २ बेकायदेशिर ३. इतर वारसांचे समतीविना ४ शेती बिगर क्षेत्र-----. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित वेळेत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम आहे. माहितीचा बोध होत नाही. यास्तव अपिलार्थी यांना अवलोकन देऊन आवश्यक माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, नगर परिषद कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11634 दिनांक : 16/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०४८८/२०२४**
**बोर्ड क्र.२८**

श्री. सतिश अण्णासाहे बारे, — अपिलार्थी
मु. पो. लक्ष्मीकॉलनी गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर ९५९५९५४०००

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. इम्रान शिराज शेख, नगर परिषद, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर, अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.१२.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिश: उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.०१.०८.२०२५ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद गंगापूर यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन दोनही व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांची दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11635 दिनांक : 16/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०५५४/२०२४**
**बोर्ड क्र.२९**

श्री. शरद अण्णा तिगोटे, — अपिलार्थी
रा. अण्णासाहेब वि ास, वाल्मीकीनगर,
कोळीवाडा वसई (पं.), ता. वसई,
जि. पालघर-४०१२०१ मो. नं.७७७००२६१०२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ले.प. तथा का.अ.
नगर पंचायत सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. विशाल रामनाथ डोईफोडे, ले.प.तथा का.अ. नगर पंचायत, सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०७.२०२४ | सन २०१६ ते आजपर्यंत या कालावधीतील सोयगाव नगर पंचायत सोयगाव,जि. औरंगाबाद यांच्या हद्दीत नगरपंचायत सोयगांव स्थापन झाल्यापासून सामान्ये नागरिकांचे जिवन मान उंचविण्यासाठी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून उपलब्ध निधीतून करण्यात आलेल्या विकास कामाबाबत घेण्यात आलेला ठराव व विकास कामाची यादी देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. आज रोजी माहिती संकलीत करुन सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आजपर्यंत माहिती अप्राप्त असल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 11636 दिनांक :- 16/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०३५३/२०२४**
**बोर्ड क्र.३०**

श्री. ओसाम नासेर कोयलाख, — अपिलार्थी
रा. अब्रार कॉलनी जवळ,
अराफात मस्जिद जवळ, बीड बाय पास रोड,
छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय खुलताबाद,
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद खुलाताबाद,
जि. छत्रपती संभजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री.ऋषीकेश जोशी, स्थापत्य अभियंता, नगर परिषद, खुलताबाद उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०८.२०२३ | TULIT कॉन्ट्रक्शन एजन्सी औरंगाबाद या एजन्सी अंतर्गत वर्ष २०१० पासून ते २०२३ पर्यंत आपल्या कार्यालयामार्फत झालेली सर्व बांधकाम रोड कामाची माहिती देणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२७.०९.२०२३ रोजीच्या प्रथम

अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१३.१०.२०२५** रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.शा.इं

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 11637 दिनांक : 16/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८५२/२०२४,४८५४/२०२४,
४८५५/२०२४,४८५६/२०२४
व ७०२५/२०२४ एकूण पाच नस्ती**

**बोर्ड क्र.३१ ते ३५**

श्री. विरेंद्र सिताराम वाघ, — अपिलार्थी
रा. कमान मोहल्ला, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०५.२०२५ व दि. ०४.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. ऋषीकेश जोशी, नगर अभियंता (बांधकाम), नगर पालिका, खुलताबाद उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.१०.२०२३ | सन २०२१-२०२२ मध्ये जिल्हा नगरोथ्याण योजना अंतर्गत झालेल्या १४ कामापैकी प्रभाग क्र.०६ व प्रभाग क्र.०५ त्यामधील विकास कामाची व इ. माहिती मिळणेबाबत. |
| ०९.१०.२०२३ | दि.२१.०९.२०२३ ते आजपर्यंत या कालावधीतील वार्ड क्र.३ निकृष्ट कामाबाबद आपल्या कार्यालयास माझ्या तक्रार अर्ज दि.२१.०९.२०२३ बाबत माहिती. |
| ०६.१०.२०२३ | दि.२५.११.२०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील मुख्याधिकारी न प खुलताबाद यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने इतर ८ मुद्याबाबत. |
| १३.१०.२०२३ | दि.०३ ऑक्टोबर २०२२ ते अजापर्यंत या कालावधीतील श्री. विक्रम दराडे मुख्याधिकारी न. प. खुलताबाद यांची दैनंदिन डायरी व इतर.. मा. मिळणेबाबत. |
| १५.०२.२०२४ | दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२३ या कालावधीतील रोडकवडी दैनंदिन किर्द, बिले, व्हाऊचरच्या प्रत व इतर.. माहिती मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यंनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने शुल्काचा भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणी घेतली, आदेश निर्णय दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्धा अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या पाच जोडपत्र, अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या पाच माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१३.१०.२०२५** रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. मुख्याधिकारी, नगर परिषद, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे पाच द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्र.श.इं.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.** 11638 **दिनांक :** 16/9/2025 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०९५४/२०२४**
**बोर्ड क्र.३७**

डॉ. भाऊसाहेब खंडराव सुसंद्रे, — अपिलार्थी
रा. शिवाजी नगर सिल्लोड,
ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वरिष्ठ लिपीक,
नगर परिषद, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्याधिकारी,
नगर परिषद, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. राहुल दिनकर साळवे, वरिष्ठ लिपीक, नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०७.२०२३ | सन २००७ या कालावधीतील सर्वे नं.२ प्लॉट क्र.४१ सौ. साखराबाई खेडराव सुसंद्रे यांनी दि.२७.०२.२००७ ला हस्तांतरण करुन दिले त्यांचे प्रतिसाद व त्यासोबत सर्व कागदपत्रांची सर्टिफाईड कॉपी मिळणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.११.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती देऊन माहिती पासून वंचित ठेवले आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाल्याचे नमूद करुन दिनांकीत स्वाक्षरी केल्याचे दिसून येत आहे. आज अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे कोणती अपुर्ण माहिती मिळाली याबाबत बोध होऊ शकत नाही. यास्तव अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपुर्ण कोणती आहे हे कळविण्यात यावे, तदनंतर पुढील १५ दिवसात संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावे. तथापि अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपुर्ण माहितीसंदर्भात न कळविल्यास त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यात स्वारस्य नाही असे समजून अपील निकाली काढावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 12150 ------ दिनांक :- 23/9/2025 ------ नोंदणीकृत टपालाद्वारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४४६/२०२४ व १४४७/२०२४**
**बोर्ड क्र.३८ व ३९**

श्री. महेश शंकरलाल शंकरपेल्ली, — अपिलार्थी
मॉ दुर्गा निवास, शास्त्री कॉलोनी सिल्लोड, ता. सिल्लोड,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३११२, मो.नं.८४८४९९९८८८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
लेखापाल,
नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. यश अनिल हिरे, लेखापाल, नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०९.२०२३ | दि.०१.०१.२०१३ ते आजपर्यंत या कालावधीतील सिल्लोड नगर परिषद मार्फत निर्माण केलेले व्यापारी संकुल राम रहीम शॉपिंग कॉम्पलेक्स विषयी व बांधकाम / लिलाव संदर्भात दिलेले निवेदन / तक्रार विषयी एकूण चार मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |
| २०.०९.२०२३ | दि.०१.०१.२०२० ते आजपर्यंत या कालावधीतील सिल्लोड शहरांमधील जिल्हा परिषदची आपल्याकडे वर्ग झालेली शाळा संदर्भात व त्याच्या बांधकाम विषयी तीन मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, अ.क्र.३८ मध्ये काहीच माहिती प्राप्त झालेली नाही. अ.क्र.३९ मध्ये अर्धवट माहिती मिळालेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोन प्रथम अपिलावर दि.२६.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीस माहितीची प्रमाणित प्रत विनामूल्य देण्यात यावी, असे आदेशीत केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.११.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण व चुकीची माहिती दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अपुर्ण मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांचा आदेश कायम करण्यात येत आहे. या आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या दोन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11639 दिनांक : 16/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८२१२/२०२४ व ८२१३/२०२४**
**बोर्ड क्र.४० व ४१**

श्री. महेश शंकरलाल शंकरपेल्ली, अपिलार्थी
मॉ दुर्गा निवास, शास्त्री कॉलोनी, सिल्लोड, ता. सिल्लोड,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३११९२, मो. नं.८४८४९९९८८८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
रचना सहाय्यक,
नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. रितेश जनार्धन काळे, रचना सहाय्यक, नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०३.२०२४ | दि.०१.०४.२००४ ते आजपर्यंत या कालावधीतील, सिल्लोड सर्वे नंबर ९२ मधील प्लॉटींग/ भूखंड व बांधकाम विषयी पाच मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |
| २०.०३.२०२४ | नगर परिषद स्थापनेपासून ते आजतपर्यंत या कालावधीतील आपल्या कार्यालयामार्फत सिल्लोड शहर नगर परिषद हद्दीतील आजपर्यंत रद्द केलेल्या सर्व अनाधिकृत प्लॉटिंग/ ले-आउट/ भूखंड यांची माहिती मिळण्यबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, अ.क्र.४० मध्ये काहीच माहिती प्राप्त झालेली नाही. अ.क्र.४१ मध्ये अपुर्ण माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना १८१ पृष्ठांची माहिती दि.०६.०६.२०२४ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताही प्रतिसाद दिलेला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना अपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.२८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचे दोन्ही प्रथम अपील फेटाळल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय खारीत करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी मोठया कालावधीची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. यास्तव अपिलार्थी यांना सन २०२३-२०२४ या वर्ष कालावधीची माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहाय्यक, नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या दोन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी वर नमूद केल्याप्रमाणे (सन २०२३-२०२४) माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी,नगर परिषद सिल्लोड, जि. छत्रपती संभजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 11640 दिनांक :- 16/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८४९९/२०२४**
**बोर्ड क्र.४२**

श्री. इमरान खान बनेखॉ पठाण, — अपिलार्थी
रा. टिळक नगर, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर-४३१ ११२. मो. नं.७३८५८७८७११

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपमुख्याधिकारी,
नगर परिषद, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी श्री. अय्युब बाबा सय्यद, उपमुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०३.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ पासून ते ०५ मार्च २०२४ पर्यंत नगर परिषदने सर्वसाधारण सभेत मंजूर झालेले संपूर्ण ठरावाची व नामंजूर झालेल्या संपूर्ण ठरावाची सत्यप्रतित माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२६.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, ३६२/- शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करावे असे कळविले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्याप्रमाणे त्यांना दि.०६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, १८१ पृष्ठांची माहिती पाठविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतेही व कसलीही कार्यवाही व जबाबदारी पुर्ण केली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ११६५१ दिनांक : १६/९/२०२५ नोंदणीकृत टपालाद्वारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६३३५A/२०२४**
**बोर्ड क्र.४३**

श्री. शिवाजी तुकाराम जगताप, अपिलार्थी
रा. मुकूंदवाडी गांव, एन-२, सिडको, छत्रपती संभाजीनगर-
भ्र.क्र.९७६४४२०९९९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
तहसिल कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभजीनगर

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०४.२०२३ | एस.आर.एस.कंन्स्ट्रक्शन प्लॉट क्र.डी-५/१ एमआयडीसी चिकलठाणा औद्योगिक वसाहत यांनी २०११ साली अवैध मुरुम उत्खनन केले आहे. त्यांच्याविरुध्द आपल्या कार्यालयाकडे झालेल्या कारवाईच्या अनुषंगाने खालील माहिती मिळणेबाबत.१. प्लॉट नं.डी-५ एस.आर.एस. कंन्ट्रक्शन यांची मुरूम उत्खनाची परवानगीची छायांकित प्रत, २. रॉयल्टी रक्कम भरणा करुन घेतलेल्या लचनाच्या छायांकित प्रती ३. मा. तलाठी सजा औरंगाबाद यांनी दि.१५.०६.२०११ रोजी केलेल्या पंचनामाच्या छायांकित प्रती, ४. मा. तहसिलदार, औरंगाबाद यांनी दि.२४.०६.२०११ रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना कारवाई बाबत दिलेल्या आदेशाची छायांकित प्रत, ६. मा. तह सिलदार औरंगाबाद यांनी दि.२७.०६.२०११ रोजी एस आर एस कंन्ट्रक्शन यांची दि .०४.०७.२०११ रोजी चे खुलासा पत्राची छायांकित प्रत ८. मा. तहसिलदार |

| | |
|---|---|
| | औरंगाबाद यांनी वरील प्रकरणामध्ये केलेल्या कारवाईची संबंधीत सविस्तर माहिती छायांकित प्रतीत प्रमाणित करुन देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की,प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कुठलीच माहिती दिली नाही नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच दि.१३.१०.२०२५ रोजी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11643 दिनांक : 16|9|2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६२६ए/२०-२४**
**बोर्ड क्र.४४**

श्री. सदानंद भीमराव दवंडे, — अपिलार्थी
रा. डांबरी पोष्ट, चितळी पुतळी, ता.जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, डांबरी, ता. जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जालना

**(सुनावणी दिनांक १२.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०१.२०२४ | दि. ०१ जानेवारी २०२१ ते ३१ डीसेंबर २०२३ या कालावधीतील कॅशबुक, किर्दबुकाची सत्यप्रत देण्यात यावी तसेच डांबरी ग्रा.पं.कार्यालयाने घेतलेल्या ग्रामसभा व मासिक मिटींगच्या सर्व प्रोसीडींगच्या सत्यप्रती ही माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी दबाव टाकतात व माहितीचा अर्ज माघे हे असे म्हणतात. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, डांबरी, ता. जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.श.इं.
(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 11642 दिनांक : 16/9/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहितीआयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४५ ते ८१ | द्वितीय अपील क्रं. २९२८/२०२३, २९२९,४४५३ ते ४४५७/२०२३, ४०६०,४०६४,४०६१/२०२३, ६५३६,६५३१,६५३०, ४०५९, ६५३८, ६५३७,६५४४,४०५२ ते ४०५६/२०२३, ४०६२/२०२३ ते ४०६३/२०२३, ४०५७/२०२३ ते ४०५८/२०२३, ६५३९/२०२३ ते ६५४३/२०२३, ३९२८/२०२३ ते ३९३२/२०२३ एकूण ३७ प्रकरणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गोविंद राजु गडगेवाड,<br>रा. धोबी गल्ली महादेव मंदिर गल्ली, मुखेड,<br>ता. मुखेड, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी | उत्तरवादी क्र.१ व २ | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ४५ ते ५१ | २९२८,२९२९, ४४५३ ते ४४५७/२०२३ | जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | प्रतिनीधी उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थितीत |
| ५२ ते ५३ | ४०६०/२०२३ व ४०६४/२०२३ | जन माहिती अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | प्रतिनीधी उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | उपस्थित |
| ५४ ते ५५ | ४०६१/२०२३ व ६५३६/२०२३ | जन माहिती अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थितीत |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थितीत |
| ५६ | ६५३१/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, जिल्हा परिषद, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थितीत |
| ५७ व ५८ | ६५३०/२०२३ व | जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थितीत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४०५९/२०२३ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थितीत |
| ५९ | ६५३८/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थितीत |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थितीत |
| ६० ते ६८ | ६५३७,६५४४ ,४०५२/२०२३ ते ४०५६/२०२३, ४०६२ व ४०६३/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ६९ | ४०५७/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ७० व ७१ | ४०५८/२०२३, ४४३३/२०२३ | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ७२ | ६५३९/२०२३ | जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप भियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ७३ ते ७६ | ६५४०/२०२३ ते ६५४३/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ७७ | ३९२८/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भाटापूर (पमु), ता. मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ७८ | ३९२९/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येवती, ता. मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ७९ | ३९३०/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कबनूर, ता. मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ८० | ३९३१/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पैसमाळ, ता. मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |
| ८१ | ३९३२/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हेनिवडज, ता.मुखेड, जि. नांदेड, | उत्तरवादीक्र. १ | अनुपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड | उत्तरवादीक्र. २ | अनुपस्थित |

**( सुनावणीदिनांक १२.०८.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०५.२०२३(०२), ०६.०७.०२३(०५), २८.०६.२०२३(१३), ०५.०७.२०२३(०१), ०९.१०.२०२३ (११) व १९.०६.२०२३ (०५) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ३७ द्वितीय अपिले दाखल केलेली आहेत. सदर द्वितीय अपिलांची एकत्रित सुनावणी दिनांक १२.८.२०२५ रोजी घेण्यात आलेली आहे. तत्पुर्वी सुनावणीचा दिनांक व वेळ अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आला होता. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी सुनावणी दरम्यान उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. त्यानुसार आज रोजी, सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी वरीलप्रमाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केलेली आहे.

| बोर्ड | माहिती अर्ज | कलम १९(३) | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|---|

| क्रं. | दिनांक | अन्वये द्वितीय अपील क्रं. | |
|---|---|---|---|
| ४५ | १०.०२.२०२३ | २९२८/२०२३ | सन २०१६ ते २०२३ या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजना (शहर) एकूण मंजूर घरकुल लाभार्थ्यांच्या मूळ अर्जासह नोटिंगसह संपूर्ण संचिका प्रमाणित देण्यात यावी. |
| ४६ | १०.०२.२०२३ | २९२९/२०२३ | सन २०१६ ते २०२३ या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मंजूर घरकूल बांधकाम बिलाबाबत. |
| ४७ | २७.०३.२०२३ | ४४५३/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.२७.०३.२०२३ या कालावधीतील अनाधिकृत एन.ए. लेआऊट धारकांच्या नोटीसीबाबत. |
| ४८ | २७.०३.२०२३ | ४४५४/२०२३ | दि.०१.०१.२०१६ ते दि.२७.०३.२०२३या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजनेबाबत. |
| ४९ | २७.०३.२०२३ | ४४५५/२०२३ | दि.०१.०१.२०१६ ते दि.२७.०३.२०२३ या कालावधीतील गुंठेवारीसाठी दाखल करण्यात आलेल्या अर्जाबाबत. |
| ५० | २७.०३.२०२३ | ४४५६/२०२३ | दि.०१.०१.२०१६ ते दि.२७.०३.२०२३या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजनेबाबत मंजूर झालेलया लाभार्थीची नावे वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या मुळ अर्जासह नोटिंगसह संपूर्ण माहिती |
| ५१ | २८.०३.२०२३ | ४४५७/२०२३ | दि.०१.०१.२०१६ ते दि.२७.०३.२०२३या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजूर पहिला डीपीआर यादी व इतर |
| ५२ | ०५.०४.२०२३ | ४०६०/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते ०५.०४.२०२३ या कालावधीतील राज्य माहिती आयुक्तांनी द्वितीय अपील संदर्भात मुखेड उपजिल्हा रुग्णालय कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना दंड व शास्ती लावण्याचे आदेश दिले याची संख्या व यादी प्रमाणित देणे. |
| ५३ | ०५.०४.२०२३ | ४०६४/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजनेबाबत. राज्य माहिती आयुक्तांनी द्वितीय अपील संदर्भात मुखेड उपजिल्हा रुग्णालय कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना दंड व शास्ती लावण्याचे आदेश दिले याची संख्या व यादी प्रमाणित देणे. |
| ५४ | २८.०३.२०२३ | ४०६१/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.२८.०३.२०२३ य कालावधीतील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | राज्य माहिती आयुक्तांनी द्वितीय अपील संदर्भात मुखेड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना दंड व शास्ती लावण्याचे आदेश दिले याची संख्या व यादी प्रमाणित देणे. |
| ५५ | १३.०७.२०२३ | ६५३६/२०२३ | दि.०१.०१.२०२३ ते दि.१३.०७.२०२३ या कालावधीतील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या अधिकारी/ कर्मचारीबाबत. |
| ५६ | ०३.०७.२०२३ | ६५३१/२०२३ | दि.०१.०१.२०१५ ते दि.०३.०७.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयातील सर्व जन माहिती अधिकारी यांच्या सेवा पुस्तीकेच्या प्रमाणित प्रत. |
| ५७ | ३०.०६.२०२३ | ६५३०/२०२३ | दि.०१.०१.२०१९ ते ३०.०६.२०२३ या कालावधीतील आपल्या मुखेड तालुक्यातील कार्यरत असलेल्या सर्व तलाठी कामाचे ठिकाण व तेथील त्यांच्या कामाचे वेळ याबाबत संपूर्ण माहिती साक्षांकित मिळावी व इतर .. |
| ५८ | २८.०३.२०२३ | ४०५९/२०२३ | सन २०२३ ते आज अखेर दि.२८.०३.२०२३ या कालावधीतील तहसिल कार्यालयातील किती जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे आदेश दिले यांची संख्या व यादी साक्षांकित देण्यात यावी. |
| ५९ | १९.०६.२०२३ | ६५३८/२०२३ | दि.०१.०१.२०२३ ते दि.१९.०६.२०२३ या कालावधीतील मुखेड शहरातील किती परवानाधारक खत विक्रेत्यांना पीओएस मशिन वितरीत करण्यात आले त्यांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबरसह इ.प्रमाणित देण्यात यावी. |
| ६० | ३०.०६.२०२३ | ६५३७/२०२३ | दि.०१.०१.२०२१ ते दि.३०.०४.२०२१ या कालावधीतील आपल्या कार्यालयाचे आवक-जावक रजिस्टरची प्रमाणित प्रती देणे. |
| ६१ | १३.०७.२०२३ | ६५४४/२०२३ | दि.०१.१०.२०२२ ते दि.१३.०७.२०२३ या कालावधीतील मा. उपविभागीय अ ाकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय देगलूर यांचे आपल्या कार्यालयास सर्व आ.क्र.७०५९/२०२२ दि.१०.१०.२०२२ रोजी आलेल्या मुळ अर्जासह व इतर.. |
| ६२ | ०५.०४.२०२३ | ४०५२/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील क्र.२००५/मशाका-२/जमा/एनपी/सीआर-६० जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड दि.०२.०१.२००६ च्या आदेशाने व्यंकट |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | गोविंद कवटिकवार यांनी आपणाकडे मोजवणीसाठी दिलेल्या अर्जावर आपण केलेल्या कार्यवाहीच्या मुळ अर्जासह व इतर. |
| ६३ | ०५.०४.२०२३ | ४०५३/२०२३ | दि.०१.०.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील क्र.२००५/मशाका-२/जमा/एनएपी/सीआर-६० जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड दि.०२.०१.२००६ च्या आदेशाने आपणाकडे मोजणीसाठी भरण्यात आलेल्या फिसच्या पावतीची छायांकि प्रत देण्यात यावी. |
| ६४ | ०५.०४.२०२३ | ४०५४/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील क्र.२००५//मशाका-२/जमा/एनएपी/सीआर-६० जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड दि.०२.०१.२००६ च्या आदेशाने वरील कालावधीत संबंधीत अधिकाऱ्याचे व संबंधीत आवश्यक कर्मचाऱ्यांचे नाव, पद, कालावधी पत्ता,इ. |
| ६५ | ०५.०४.२०२३ | ४०५५/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील क्र.२००५//मशाका-२/जमा/एनएपी/सीआर-६० जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड दि.०२.०१.२००६ च्या आदेशाची छायांकित प्रत देण्यात यावी. |
| ६६ | ०५.०४.२०२३ | ४०५६/२०२३ | दि.०१.०१.२०२२२ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील दरमहा मोजणी प्रकरणाचा संभाव्य फिरती कार्यक्रम व त्या महातील मोजणी प्रकरणाचा अनुक्रमांकासह कार्यक्रम नोटिंग बोर्डवर लावण्यात आलेल्या नोटीसांची प्रमाणित प्रत. |
| ६७ | १०.०४.२०२३ | ४०६२/२०२३ | दि.०१.०१.२०२२ ते दि.१०.०४.२०२३ या कालावधीतील मुळ अर्जासह व त्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्राबाबत. |
| ६८ | ०५.०४.२०२३ | ४०६३/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०३.०४.२०२३ या कालावधीतील क्र.२००५//मशाका-२/जमा/एनएपी/सीआर-६० जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड दि.०२.०१.२००६ च्या आदेशाने |
| ६९ | ०५.०४.२०२३ | ४०५७/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील राज्य माहिती आयुक्तांनी द्वि अ संदर्भात मुखेड एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयातील जन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे आदेश दिले त्यांची संख्या व यादी व इतर.. |
| ७० | ०५.०४.२०२३ | ४०५८/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील राज्य माहिती आयुक्तांनी द्वि अ संदर्भात मुखेड जि.प.ल.पा. उपविभागी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे आदेश दिले त्यांची संख्या व यादी व इतर.. |
| ७१ | ०५.०४.२०२३ | ४४३३/२०२३ | दि.०१.०१.२००४ ते दि.०५.०४.२०२३ या कालावधीतील राज्य माहिती आयुक्तांनी द्वि अ संदर्भात मुखेड जि.प.(बांधकाम) उपविभाग कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे आदेश दिले त्यांची संख्या व यादी, इतर.. |
| ७२ | ३०.०६.२०२३ | ६५३९/२०२३ | दि.०१.०१.२०२२ ते दि.३०.०४.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयाचे आवक-जावक रजिस्टरची प्रमाणित प्रती देणे. |
| ७३ | २६.०६.२०२३ | ६५४०/२०२३ | दि.०१.०१.२०१९ ते दि.२६.०६.२०२३ अनु.जाती-जमातीच्या सदस्यांसाठी १५ टक्क निधीचा वापर कसा कोणत्या पध्दतीने करावा याबाबतचे संपुर्ण शासन निर्णय मार्गदर्शक सूचना आणि त्यासंबंधीत असलेल्या संपूर्ण दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रत व इतर.. |
| ७४ | १९.०६.२०२३ | ६५४१/२०२३ | दि.०१.०१.२०१७ ते दि.१९.०६.२०२३ या कालावधीतील १५ व्या वित्त आयोग निधीतून ग्रामपंचायती मार्फत खरेदी केलेल्या वस्तु पुर्ण केलेल्या योजना विकास कामे इ. निकषाप्रमाणे तसेच आर्थिक व भौतिक अहवाल गट विकास अधिकारी साहेब यांनी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत यांना पाठवलेले अहवालाच्या प्रमाणित प्रती. |
| ७५ | ३०.०६.२०२३ | ६५४२/२०२३ | दि.०१.०१.२०२३ ते दि.३०.०६.२०२३ या कालावधीतील आपल्या मुखेड तालुक्यात कार्यरत असलेल्या सर्व ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांचे कामाचे ठिकाण व तेथील त्यांच्या कामाचे वेळ याबाबत संपूर्ण माहिती |
| ७६ | ३०.०६.२०२३ | ६५४३/२०२३ | दि.०१.०१.२०१८ ते दि.३०.०६.२०२३ या कालावधीतील तालुक्यातील सर्व ग्रामसेवक यांच्या नियुक्ती व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ग्रामपंचायत कार्यालयातील कार्यकाळाबाबत. |
| ७७ | १५.०२.२०२३ | ३९२८/२०२३ | सन २०१६ ते २०२३ या कालावधीतील प्राधनमंत्री आवास योजना (ग्रामीण)घरकुल मंजूर संबंधीत माहिती मिळणेबाबत. |
| ७८ | १५.०२.२०२३ | ३९२९/२०२३ | सन २०१६ ते २०२३ या कालावधीतील प्राधनमंत्री आवास योजना (ग्रामीण)घरकुल मंजूर व इतर.. संबंधीत माहिती मिळणेबाबत. |
| ७९ | १५.०२.२०२३ | ३९३०/२०२३ | सन २०१७ ते आज अखेरपर्यंत आपल्या ग्रामपंचायत हद्दीत एकूण मंजूर अखेर पर्यंत पंतप्रधान आवास योजना घरकुल संबंधित माहिती व इतर.. |
| ८० | १५.०२.२०२३ | ३९३१/२०२३ | सन २०१६ ते २०२३ या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) घरकुल संबंधीत व इतर..माहिती |
| ८१ | १५.०२.२०२३ | ३९३२/२०२३ | सन २०१६ ते २०२३ या कालावधीतील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) संबंधीत व इतर.. माहिती |

२. आज रोजी सुनावणीच्यावेळी वरीलप्रमाणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी हे बाहेरगावी कामासाठी स्थलांतर झालेले आहेत. ते प्रत्यक्षात कार्यालयात उपस्थित कधीही राहिलेले नाहीत. अपिलार्थी यांना आतापर्यंत कार्यालयात पाहिलेले नाही. त्यासाठी त्यांच्या नावाने कोणतीतरी माहितीचे अर्ज व प्रथम अपील करत आहेत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची आहे. कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणारी माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन (डॉक्टरांच्या वेळापत्राकाची) माहिती देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने मागणी केलेली माहिती देता येत नाही असे वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. कर्मचारी अपुरे असल्यामुळे अपिलार्थी यांना वेळेत माहिती देता आलेली नही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती देण्यात येईल. तसेच मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अर्जदारास सदर माहिती संकलित करुन द्यावयाची झाल्यास नियमित कामकाजावर त्याचा परिणाम होऊन नियमित कामे खोळंबून राहतात. यास्तव अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणे विषयी कळविले, असता अपिलार्थी अवलोकनासाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी यांनी एकाच तारखेत अनेक माहितीचे अर्ज कार्यालयात करुन जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी केलेली आहे. सदर अर्जावर कार्यवाही

करताना कार्यालयाच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांची आयोगासमोरील सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले सर्व विचाराधीन अपिले निकाली काढण्याची विनंती करण्यात येत आहे.

३. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी, गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, मुखेड, जि. नांदेड यांनी दि.०८.०५.२०२५ रोजी लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की, सदर सुनावणी दरम्यान पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर **<u>हर घर निरंगा व Panchayat Advancement Index २.० (PAI)</u>** हे कार्यक्रम असल्यामुळे दि.१२.०८.२०२५ व १३.०८.२०२५ रोजीची सुनावणी ही पुढील दिनांकास घेवून उपकृत करावे अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी वेगवेगळ्या कार्यालयामध्ये विविध विषयाबाबत एकुण ३७ माहितीचे अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेले आहेत. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना सर्व अर्जांना ३० दिवसाच्या मुदतीत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थी यांनी या पध्दतीने एका जन माहिती अधिकारी यांचेकडे मोठया प्रमाणावर माहितीचे अर्ज देऊन माहितीची मागणी करणे ही बाब माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण केल्या सारखी असल्याचे स्पष्ट होत आहे. एका व्यक्तीने मोठया संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

४. अपिलार्थी यांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन प्रशासकीय कामकाम सांभाळुन माहिती अधिकारात माहिती देण्याचे काम करतात. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, या अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही, त्यामुळे याचा विपरित परिणाम कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर होतो. अशा मोठया प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे

गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमजबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे प्रथम दर्शनी मत आहे.

५. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना,या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

